शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

विद्वत्प्रमाणित, यू.जी.सी. मान्यताप्राप्त त्रैमासिक

(Peer Reviewed Referred Research Journal)

ISSN No. 2319-6025


# शिविम संशोधन पत्रिका


वर्ष-नववे : जोडअंक-एकवीस आणि बावीस : जानेवारी ते जून २०२०


## मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील विविध संप्रदाय

दिनांक १ व २ फेब्रुवारी, २०२०



## सद्‌गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड

(स्वायत्त महाविद्यालय)

ता. कराड जि. सातारा

राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा)

* वीरशैव संप्रदाय आणि श्रीबसवेश्वरांचे कार्य
डॉ.सुभाष जाधव ४०७
* लिंगायत धर्माचे तत्त्वज्ञान
डॉ. मांतेश हिरेमठ ४११
* युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वरांचे प्रेरणादायी वचन साहित्य
संगीता आरळी ४१६
* महात्मा बसवेश्वरांच्या बसववचनातील स्त्रीविषयक जाणिवा
प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे ४२०
* शिवशरणी अक्कमहादेवी यांच्या वचनसाहित्यातील विचारतत्त्वे
डॉ. दत्ता पाटील ४२३
* मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील समर्थ संप्रदायाचे अवलोकन
डॉ. शिवाजी पाटील ४२७
* समर्थ संप्रदाय
डॉ. शर्मिला घाटगे ४३०
* समर्थ संप्रदाय
प्रा.महेश कुलकर्णी ४३४
* रामदासांचा समर्थ संप्रदाय
डॉ. वैशाली औताडे ४३७
* समर्थ संप्रदाय: तत्त्वज्ञान आणि वाङ्मय
प्रा.अंकुश घुले ४४०
* मनाच्या आरोग्यासाठी मनाचे श्लोक
डॉ.संग्राम थोरात ४४४
* रामदासांची लोकशिक्षकाची भूमिका
डॉ. सविता माळी ४४७
* वेणाबाई ते वेणास्वामी
डॉ. रेश्मा दिवेकर ४५२
* गुरू नानकदेवजींचा  पुरोगामी दृष्टीकोन
डॉ.सुभाष वाघमारे ४५६
* मुस्लिम आणि ख्रिस्ती संतांचे योगदान
डॉ. बाळासाहेब चव्हाण ४६१
* 'मुडलगी संप्रदायातील मराठी संत कवयित्री– राधाबाई'
डॉ. धनंजय होनमाने ४६६
* चिमड संप्रदायाच्या प्रचार व प्रसारासाठी साहित्यसंपदेचे योगदान
नारायण आपटे, ४६९
* नागेश संप्रदाय आणि अज्ञानसिद्धांच्या साहित्यातील समाज–संस्कृती दर्शन
डॉ. देवीदास गायकवाड ४७२
* आनंदसंप्रदाय आणि त्यांचे वाङ्मय
डॉ. बाळकृष्ण शिंदे ४७६

# समर्थ संप्रदाय: तत्त्वज्ञान आणि वाङ्मय

**प्रा.अंकुश घुले**
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर

समर्थ रामदासांनी समाजाला मार्गदर्शन करण्यासाठी स्वतंत्र पंथाची उभारणी केली. याच संप्रदायाला रामदासी पंथ, समर्थ संप्रदाय, अशा नावानी ओळखले जाते. समर्थ स्वत: या संप्रदायाला राघवाचा पंथ' असे म्हणतात. सोळाव्या शतकामध्ये महाराष्ट्रात अत्यंत बिकट सामजिक व राजकीय परिस्थिती होती. परकीयांचे आक्रमणे वारंवार होत होती. अशा परिस्थितीत समाजामध्ये भीतीचे वातावरण होते. याच काळात महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची' स्थापना केली होती. महाराजांच्या स्वराज्यामध्ये प्रजा सुरक्षित होती. मात्र परकीय आक्रमणे आल्यावर या प्रजेचे अतोनात हाल होत होते. परकीय शासन कर्ते स्त्रिया, मुलींवरती अत्याचर करीत असत. शेतातील धान्यांचे नुकसान करीत असत. त्यामुळे समाजामध्ये भीतीचे वातावरण होते. अशा समाजाला आधाराची गरज होती. समर्थांना तीर्थयात्रा करीत असताना हे सर्व लक्षात आले होते. त्यातूनच त्यांना संप्रदाय उभारण्याची प्रेरणा मिळाली. समाजतील लोकांना अस्मानी-सुलतानी संकटातून बाहेर काढण्यासाठी समर्थांनी येथील लोकांना संप्रदायाच्या माध्यमातून शिकवण दिली.

प्रभू श्रीराम व हनुमंत ही या संप्रदायाची आराध्य दैवते होती. दोन्ही दैवते ही सामर्थ्यशाली होती. तसेच आदर्श ही होती. समर्थांनी या दोन दैवतांची उपासना या संप्रदायातून सांगितली आहे. तसेच संप्रदायातील लोकांना या दोन दैवतांना आदर्श मानून तसे आचरण करायला सांगितले. या बरोबरच समर्थांनी गावोगावी हनुमंताची मंदीरे उभा केली. तसेच तालमी ही उभा केल्या. यातून समर्थांनी बलोपासना' सांगितली आहे. समर्थांनी बलोपासनेला संप्रदायातून प्राधान्य दिले आहे. परकीय आक्रमणाच्या वेळी प्रत्येकांनी त्याला सारे जाऊन विरोध केला पाहिजे. त्यासाठी आपली शरीरयष्टी मजबूत पाहिजे त्यासाठी समर्थांनी तालमी उभ्या केल्या आहेत. त्यांना प्रेरणा मिळावी म्हणून हनुमंताची मंदीरे उभी केली आहेत. यातून समर्थांनी सर्वसामान्य प्रापंचीक लोकांना या संप्रदायातून प्रयत्नवाद शिकविला आहे. समर्थ म्हणतात आधी कर्म करावे. आपले कर्म करीत असताना उपासना करावी त्या उपासनेतून ज्ञानाची प्राप्ती होते व ज्ञानी माणसाला मोक्ष मिळतो. अशी या संप्रदायाचे सोपे तत्वज्ञान आहे. समर्थ संप्रदायाविषयी म्हणतात,

जाणावा रामदासांचा । हाचि संप्रदाय
व्रत ज्यांचे ब्रह्मचारी । वस्त्रे ज्याची हुर्मूजी बरी

या श्लोकातून सांप्रदायिक तत्त्वज्ञान विशद होते. या संप्रदायातून धर्म, उपासना, बलोपासना, कर्म, ज्ञान, व्यवहार, अध्यात्म, राजकारण, श्रीरामाची भक्ती, यातून समर्थांनी सर्वसामान्यांच्या उद्धाराचे कार्य केले आहे. अशा प्रकारे आपणास समर्थ संप्रदायाचे तत्त्वज्ञान सांगता येईल.

**समर्थांचे वाङ्मयीन कार्य**

समर्थांनी विपुल प्रमाणात वाङ्मयाची निर्मिती केलेली आहे. त्यांच्या वाङ्मयातून अध्यात्मा बरोबरच तत्त्कालीन सामाजिक, धार्मिक, राजकीय परिस्थितीविषयी माहिती आपणास मिळते. त्यांच्या रचनेमध्ये देखील विविधता आढळते.

**करुणाष्टके**

समर्थांची करुणाष्टके ही नावाप्रमाणेच कारुण्यानी भरलेली आहेत. त्यांच्या साधक अवस्थेतील धडपड व तळमळ यातून प्रतिबिंबित झाली आहे. त्यांची धडपड व तळमळ प्रभू श्रीरामाला भेटण्यासाठी असलेली दिसते. साधक अवस्थेत श्रीरामाला भेटण्यासाठी त्यांच्या मनाची झालेली अवस्था करुणाष्टकात आली आहे. या करुणाष्टक रचनेला शंकराव देव हे रडविणारी कविता असे म्हणतात. तर प्राचीन मराठी साहित्याचे अभ्यासक शं.गो.तुळपुळे म्हणतात की, करुणाष्टकाचे तंत्र एकच आणि ते म्हणजे त्यात ओतप्रोत भरलेले कारुण्य, असहायता, अगतिकता, आर्त, रामदासांच्या करुणाष्टकात हे तंत्र नीटपणे सांभाळले गेले आहे. उदा:

अनुदिन अनुतापे तापोलो रामराया
परमदिन दयाळा नीरसी मोहमाया

**एकवीस समासी**

समर्थांनी संप्रदायाच्या नियमित पठणासाठी एकवीस समासी हा ग्रंथ लिहिला आहे. समर्थ संप्रदायात या ग्रंथाचे नियमित पठण केले जाते. या ग्रंथालाच 'जुना दासबोध' असेही म्हणतात. समर्थ स्वतः या ग्रंथाचा उल्लेख 'दासबोध' असाच करतात. या ग्रंथाची ओवी संख्या १३४० इतकी आहे. प्रामुख्याने या ग्रंथातून वक्ता आणि श्रोता, निंदा आणि निंदक व दैव आणि प्रयत्न या तीन विषयावर समर्थांनी उत्कृष्ट विवेचन केले आहे. एकवीस सामासीचा मूळ विषय परमार्थ विवेचन असून त्यात निवृत्तीचे तत्त्वज्ञान व्यक्त होते. याशिवाय यातून सात्शिष्याची लक्षणे, नवविधा भक्ती, भक्तीचे स्वरूप याविषयी विवेचन आले आहे. यामध्ये एकवीस समास आहेत. प्रत्येक समासातून एक-एक विषय समर्थांनी हाताळला आहे.

**रामायण**

समर्थांनी लघुरामायण व दीर्घरामायण अशी दोन रामायणे लिहिली आहेत. लघुरामायण ही समर्थांची सुरुवातीच्या काळातील रचना आहे. यात १२५ ओव्या आहेत. यातून रामभक्ती विषयी माहिती सांगितली आहे. या लघुरामायणालाच लघुरामचरित्र असेही म्हणतात. रावणाच्या बंदिवासातील देवांचे वर्णन येथे येते. याचबरोबर वानर व राक्षस यांच्या युद्धाचे वर्णन देखील यातून आले आहे.

दीर्घरामायणातून मूळ रामायणातील दोन प्रसंग आले आहेत. वाल्मिकी रामायणातील सुंदरकांड व युद्धकांड या दोन प्रसंगाचे वर्णन केले आहे. समर्थांचे युद्धकांड १३०० श्लोकांचे आहे. तर सुंदर व युद्धकांड मिळून १४६२ श्लोक आहेत.

**मनाचे श्लोक**

समर्थांनी २०५ मनाचे श्लोक लिहिले आहेत. यातून समर्थ मनाला उपदेश करतात. माणसाचे मन चंचल असते, ते कधीही चांगला विचार करीत नाही. परंतु अशा या मनाला

समर्थ 'सज्जन' असे म्हणतात. या मनाच्या श्लोकातून समर्थांनी मनाला बोध दिलेला आहे. रामभक्ती, रामभक्तीतून मिळणारे सामर्थ्य सांगितले आहे. मनाला भक्तीचे महत्त्व ही पटवून दिलेले आहे. उदा:

मना सज्जना भक्तीपंथेचि जावे।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे ।

**दासबोध**

दासबोध हा ग्रंथ समर्थांची ओळख असणारा ग्रंथ आहे. या ग्रंथाची ओवीसंख्या ७७५१ इतकी आहे. या ग्रंथाचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग पडतात. जवळ-जवळ ५० वर्ष या ग्रंथाचे लेखन चालले होते. अनेक ग्रंथांचा अभ्यास करून समर्थांनी हा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथात गुरु आणि शिष्य यांचा संवाद आहे. या ग्रंथामधून अनेक विषय समर्थांनी हाताळले आहेत. नवविधा भक्तीचे महत्त्व, मूर्खाची लक्षणे, स्वत्वगुणांची ओळख, विवेक वैराग्य, असे अनेक विषय दासबोध या ग्रंथातून आले आहेत. दासबोधाच्या पहिल्याच दशकातील पहिल्या समासात समर्थ म्हणतात, ग्रंथ नाम दासबोध । गुरुशिष्यांचा संवाद । येथ बोलिला विशद । भक्तिमार्ग ।। यावरून दासबोध ग्रंथातून गुरुशिष्य संवाद रूपातून भक्तिमार्गाचे वर्णन केलेले आहे असे म्हणता येईल. याच समासात समर्थ पुढे म्हणतात, नवविधा भक्ती आणि ज्ञान । बोलिले वैराग्याचे लक्षण । बहुधा आध्यात्म निरुपण । निरूपिले ।। समर्थ म्हणतात की, या ग्रंथाच्या माध्यमातून नवविधा भक्ती तसेच त्यातून मिळणारे ज्ञान, वैराग्याची लक्षणे आणि आध्यात्मिक निरुपण असे या ग्रंथाचे स्वरूप आहे. या ग्रंथात एकूण २० दशक आहेत. २० दशकामध्ये प्रत्येकी १० असे २०० समास आहेत. म्हणजेच २० दशक आणि २०० समासाचा मिळून हा ग्रंथ बनला आहे.

**स्फुट प्रकरणे**

समर्थांनी विपुल प्रमाणात स्फुट काव्य रचना केली आहे. त्यांनी जवळ-जवळ ६९ स्फुट प्रकरणे लिहिली आहेत. ती अनेक निरनिराळ्या विषयावर आधारित आहेत. त्यांनी आपल्या वाङ्मयातून प्रयत्नवादाचा पुरस्कार केलेला आहे. मनुष्याने सतत कार्य तत्पर असले पाहिजे असे ते सांगतात. त्यांची प्रमुख स्फुट प्रकरणे आपणाला पुढीलप्रमाणे सांगता येतील;

**अस्मानी - सुलतानी**

समर्थांना तीर्थयात्रा करीत असताना आलेले अनुभव त्यांनी अस्मानी सुलतानी प्रकरणाच्या माध्यमातून मांडले आहेत. तत्कालीन समाजाची दयनीय अवस्था यातून प्रकट होते. अस्मानी - सुलतानी संकटामुळे समाजाची होत असलेली वाताहत या प्रकरणाच्या माध्यमातून मांडली आहे. उदाः

देश नासला नासला उठे तोचि कुटी ।
पिकें होताचिं होताचिं होती लुटालुटी ।

या एका श्लोकावरून आपणाला तत्कालीन परिस्थितीची कल्पना येते.

**परचक्र निरुपण**

परचक्र निरुपणात ही अस्मानी-सुलतानी प्रमाणेच परचक्रामुळे निर्माण झालेली सामाजिक

परिस्थितीचे चित्रण आले आहे. परचक्र म्हणजेच परकीय आक्रमण होय. अशा आक्रमणाच्या वेळी समाजाची फार मोठी हानी होते. समाजामध्ये भीतीचे वातावरण पसरते. परकीयांकडून सर्वत्र अन्याय, अत्याचार केले जातात. यामध्ये सर्व समाज भरडून निघतो. याचे चित्रण या प्रकरणात आले आहे. उदाः पदार्थ मात्र तितुका गेला । नुसता देशचि उरला ।।

आनंदवनभुवन

यालाच श्रीवनभुवनी असेही म्हणतात. समर्थांना घडलेल्या साक्षात्कारानुसार उद्याच्या महाराष्ट्राचे जे आशावादी चित्र आहे ते समर्थांनी आनंदवनभुवन या प्रकरणातून मांडले आहे. हे प्रकरण समर्थांनी तीर्थयात्रा करून आल्यानंतर लिहिले आहे. 'आनंदवनभुवन' याचा अर्थ काशी तीर्थक्षेत्र असाही होतो. म्हणून या प्रकरणातून काशीचे वर्णन आले आहे असे काही अभ्यासकांचे मत आहे.

याबरोबरच समर्थांनी रामवरदायिनी, जुनाट पुरुष, भीमरूपी स्तोत्रे, आरत्या इ. अनेक छोटी-मोठी काव्य लिहिली आहेत. याचे नित्य पठण समर्थ संप्रदायामध्ये भक्तिभावाने केले जाते.

**संदर्भ**


१. ग. वि. अकोलकर :श्रीसमर्थचरित्र, आ.२, १९७४, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

२. श्री. र. कावळे : समर्थ-दर्शन, १९८२, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

३. डॉ. वनिता ठाकूर : समर्थ रामदासांचे मनाचे श्लोक, २००२ मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

४. शं. गो. तुळपुळे : पाच संतकवी, १९८४, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे

५. शं. दा. पेंडसे :महाराष्ट्राचा भागवत धर्म-४ राजगुरू समर्थ रामदास.

६. न. र. फाटक : श्री समर्थ चरित्र वाङ्मय आणि संप्रदाय


* * * * * *